# शिवाजी विद्यापीठ

# ५६ वा दीक्षांत समारंभ–मिरवणूक

**६ फेब्रुवारी २०२० सकाळी ०९.०० वाजता**

**मा.अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषद सदस्य आणि विद्यापरिषद सदस्य यांचेकरिता**

## * माहितीपत्रक *

शिवाजी विद्यापीठाच्या छप्पन्नाव्या वार्षिक दीक्षांत समारंभाच्या वेळी मा. अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेचे सदस्य यांनी मिरवणुकीने व्यासपीठापर्यत जाण्याचे आहे. मिरवणुकीची पूर्वतयारी व्यवस्थित व्हावी. या दृष्टीने पुढील बाबींकडे सदस्यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**मा.अधिष्ठाता आणि व्यवस्थापन परिषद सदस्य**

- **अधिष्ठाता आणि व्यवस्थापन परिषद सदस्य यांची पोशाख तसेच मानवस्त्र परिधान करण्याची व्यवस्था खोली नं. २३३ मध्ये करण्यात आली आहे.** तत्पूर्वी मुख्य इमारतीच्या मुख्य प्रवेश द्वाराच्या आतील बाजूच्या स्वागतकक्षाच्या समोर मा. कुलगुरू हे व्यवस्थापन परिषद सदस्य व विद्याशाखा अधिष्ठाता यांचा मा. कुलपती व मा. प्रमुख पाहुण्यांना परिचय करून देतील. त्यानंतर **मा. कुलपती,** मा. कुलगुरू, मा.प्र–कुलगुरू व प्रमुख पाहुणे यांचे समवेत राजर्षी छत्रपती शाहू सभागृहासमोर छायाचित्र घेण्यात येईल. यासाठी सर्व सदस्यांनी **दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२०** इ. रोजी **सकाळी ९.००** वाजता **खोली क्र. २३३** येथे उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**विद्यापरिषद सदस्य**

- **पूर्व तयारीसाठी विद्यापरिषद सदस्यांनी दि. ०६/०२/२०२० रोजी सकाळी ९.०० पर्यत राजर्षी छत्रपती शाहू सभागृहामध्ये उपस्थित रहावे अशी विनंती आहे.** विद्यापीठ कार्यालयात विद्यापरिषदेच्या सदस्यांना बसण्यासाठी आयोजित केलेल्या जागेजवळ मिरवणुकीची सर्व सिध्दता होईल. सदस्यांनी जोडया करून मिरवणुकीसाठी उभे रहावयाचे आहे. या कामासाठी नियुक्त केलेले विद्यापीठाचे अधिकारी मिरवणूक ज्या क्रमाने तयार करावयाची आहे त्या क्रमाने नावे पुकारतील. उपस्थित विद्यापरिषद सदस्यांनी त्याप्रमाणे जोडया तयार करून मिरवणुकीत सामील व्हावे.
- मिरवणुकीत भाग घेणा–या अधिकार मंडळाच्या सर्व सदस्यांची विद्यापीठाने आवाहन केलेप्रमाणे दीक्षांत समारंभाचा पोषाख तसेच मानवस्त्र परीधान करणेसाठीची व्यवस्था राजर्षी छत्रपती शाहू सभागृहात करण्यात आली आहे.
- मिरवणुक सकाळी १०.४५ वाजता सुरू होईल. मिरवणुकीच्या अग्रभागी मा. प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ हे राहतील, मिरवणुक मंडपात जाऊन थांबेल. मिरवणूक थांबल्यानंतर फक्त विद्यापरिषदेच्या प्रत्येक जोडीतील एक सदस्य उजव्या बाजूला व दुसरा सदस्य डाव्या बाजूला जाऊन समोरासमोर (एकमेकांकडे तोंड करून) उभे राहतील. अशा रितीने दोन रांगा तयार होतील. मा. प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ नंतर परत फिरतील व त्या दोन रांगा मधून मागे कुलसचिव यांच्यापर्यत जातील व तेथून ते विद्यापरिषदेच्या सदस्यांच्या रांगामधून कुलसचिव, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व अधिष्ठाता यांना मिरवणुकीने व्यासपीठासमोर घेऊन जातील. ही मिरवणूक थांबल्यानंतर तात्काळ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व अधिष्ठाता वरील पध्दतीनेच एक सदस्य उजव्या बाजूला व दुसरा सदस्य डाव्या बाजूला या पध्दतीने समोरासमोर उभे राहतील. पूर्वीच्या दोन रांगांच्या सोबत सामील होतील. तद्‌नंतर मा. प्र. संचालक हे मा. कुलसचिव यांच्या समवेत मा. कुलपती, मा.कुलगुरू, मा. प्र–कुलगुरू व मा. प्रमुख पाहुण्यांना व्यासपीठावरील त्यांच्या स्थानापर्यत घेऊन जातील. त्यानंतर ओळीत उभे असलेले सदस्य ओळी प्रमाणे **प्रथम विद्याशाखा अधिष्ठाता, नंतर व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व शेवटी विद्यापरिषदेचे सदस्य या क्रमाने निघून आपापल्या ठरलेल्या ठिकाणी डाव्या व उजव्या बाजूस स्थानापन्न होतील.**
- मा. कुलपती, मा. कुलगुरू, मा. प्र–कुलगुरू व मा. प्रमुख पाहुणे समोरून जात असताना ओळीत उभे असलेले सदस्य मा. कुलपती, मा. कुलगुरू, मा. प्र–कुलगुरू व मा. प्रमुख पाहुणे यांना अभिवादन करतील. सर्व सदस्यांना विशेष विनंती करण्यात येते की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत आपल्या ओळी मोडू नयेत. त्यांना लागून असलेली खालची जोडी त्यांच्यापासून पुढे निघून जाईपर्यत त्यांनी आपापल्या जागीच उभे रहावे.
- दीक्षांत समारंभ समाप्त झाल्याचे उद्‌घोषित होवून राष्ट्रगीत झाल्यानंतर प्रथम प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ ज्ञानदंड घेवून विसर्जन मिरवणूकीत सामील होतील तद्‌नंतर कुलसचिव, प्र–कुलगुरू, कुलगुरू, प्रमुख पाहुणे व मा. कुलपती तद्‌नंतर अधिष्ठाता व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद जोडी करून विसर्जन मिरवणूकीत सामिल होतील. तरी आपण वरील सूचनांप्रमाणे मिरवणूक पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, ही विनंती.

**प्र.संचालक**<br>
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर कोल्हापूर ४१६ ००४**